



# पारनेर दर्शन






वर्ष ३ अंक १५, गुरुवार २८ नोव्हेंबर २०२४ | संपादक : देविदास आबूज | कार्यकारी संपादक : विजय वाघमारे | RNI No.MAHMAR/2015/61493 | किंमत : ३ रुपये

# टपाली मतदानाचा कल बदलला कसा?

## खा. नीलेश लंके यांचा सवाल | दिल्लीत पत्रकारांशी संवाद | ईव्हीएमविरोधात आता जनतेनेच उठाव करावा

नवी दिल्ली : विशेष प्रतिनिधी

**कोणत्याही निवडणूकांचा आजवरचा अनुभव पाहा, जो टपाली मतदानाचा कल असतो तोच कल मतपेटीतून बाहेर येतो. पाच-दहा टक्के त्यात फरक पडतो. असे असताना यंदाच्या विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांना टपाली मतदानाचा कौल असताना ईव्हीएमच्या मोजणीत मात्र तो कल दिसून आला नाही तो कल कसा बदलला असा प्रश्न उपस्थित करत खा. नीलेश लंके यांनी ईव्हीएम मशिनवरील मतदानावर शंका उपस्थित केली. ईव्हीएम विरोधात आता जनतेनेच आवाज उठविणे गरजेचे असल्याचीही पुस्ती त्यांनी जोडली.**

लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनास उपस्थित राहण्यासाठी खा. नीलेश लंके हे सध्या दिल्लीत पोहचले असून दिल्लीत पोहचताच पत्रकारांनी त्यांना गाठत प्रश्नांचा भडीमार केला. लंके यांनी त्यांच्या प्रश्नांवर सविस्तर उत्तरे देत आपली राजकीय प्रगल्भता सिध्द केली. खा. लंके यांच्यासमवेत खा. बजरंग सोनवणे, खा. भास्कर भगरे तसेच लंके यांचे सहकारी पंचायत समितीचे मा. सदस्य राजेंद्र चौधरी, सचिन पठारे हे होते.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचा पराभव झाला, त्यामागिल वस्तुस्थिती नेमकी काय आहे ? या प्रश्नावर बोलताना खा. लंके म्हणाले, महायुतीने विजय संपादन केल्यानंतर घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजितदादा पवार यांचे चेहरे सांगत होते की हा विजय सत्याचा नाही.

खा. लंके पुढे म्हणाले, निवडणूका कोणत्याही पाहा. जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभेच्या निवडणूकीच्या निकालांमध्ये जो टपाली मतदानाचा कल असतो तोच कल मतपेटयांमधील मतदानामध्ये  असतो. त्यात पाच-दहा टक्के फरक  असू शकतो.



लोकसभेच्या हिवाळी अधिवेशनासाठी दिल्लीत पोहचल्यानंतर खासदार नीलेश लंके यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला.

### लोकसभेला यश मिळाले तिथेचा घात झाला

लोकसभेला तुमच्या बाजूने कौल मिळाला आता तुमच्या विरोधात लागला म्हणून ईव्हीएमला विरोध केला जात असल्याची टीका भाजपाकडून केली जात असल्याच्या प्रश्नावर बोलताना खा. लंके म्हणाले, लोकसभा निवडणूकीत आम्हाला जे यश मिळाले तिथेच खरा घात झाला. विरोधकांना जाग आली. आपल्या बाजूने जनता राहिली नाही. तुम्ही महाराष्ट्रात पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या व महायुतीच्या सभा पाहा. महायुतीच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभेलाही गर्दी नव्हती त्याचे चित्रीकरण तुम्ही वृत्तवाहिन्यांनीच केले आहे. त्यांच्या अनेक सभा यशस्वी झाल्या नाहीत. मग असा बदल कसा होऊ शकतो ? टपाली मतदानाचा कल मतपेटीतील मतांमध्ये असतो, तो यावेळी कसा बदलला ? हीच खरी शंकेची बाजू आहे. मनसेच्या उमेदवाराच्या घरात सहा मते आहेत त्यांना दोन मते  आहेत अशी कितीतरी उदाहरणे आहेत. कराडमधील एका मतदारसंघात १ हजार ७०० मतदान झाले, तिथे २ हजार १०० मते मोजली गेली. नगर तालुक्यातील वाळकी येथे मतदान कमी व मते जास्त मोजली गेली. या सत्य घटना आहेत.

नीलेश लंके
खासदार, लोकसभा

### ईव्हीएमची मोजणी सुरू झाली आणि जागा कमी झाल्या !

ज्यावेळी अनेक एजन्सीजकडून विधानसभेच्या विविध मतदारसंघात सर्वेक्षण केले त्यावेळी महाविकास आघाडी व महायुतीमध्ये पाच दहा जागांचा फरक दिसून येत होता. तसाच कल टपाली मतदानामध्येही पहावयास मिळाला. टपाली मतदानात महाविकास आघाडीचे सर्वाधिक उमेदवार पुढे होते. मात्र ईव्हीएम मशिनची मोजणी सुरू झाल्यानंतर अचानक पन्नास जागा कमी झाल्या. त्यामुळे आमचा यांत्रीकीकरणावर विश्वास नाही असे लंके यांनी सांगितले.

### टीम वर्क तरीही शुन्य मते !

खासदार भास्कर भगरे  एक व्हिडीओ दाखविला. धुळयाचे उमेदवार कुणाल पाटील यांच्या मतदारसंघातील असे एक गाव आहे तिथे त्यांच्या संस्थेचे कर्मचारी तसेच कार्यकर्त्यांचे टीम वर्क आहे, त्या गावात पाटील यांना शुन्य मते मिळाली असल्याचे लंके म्हणाले.

### प्रत्येक सर्वेक्षणात आम्ही पुढे

माझ्या मतदारसंघात अनेक एजन्सींकडून सर्वेक्षण करण्यात आले. त्यात किमान ५० हजारांच्या मताधिक्क्याने आमचा उमेदवार विजयी होईल असा अंदाज वर्तविण्यात आला होता. आम्हीही मोबाईलदवारे सर्वेक्षण केले असता आमचा प्रतिस्पध उमेदवार २० टक्क्याने मागे होता असा दावा खासदार  लंके यांनी यावेळी केला

### थोरात यांचा पराभव धक्कादायक

बाळासाहेब थोरात यांचा या निवडणूकीतील पराभव धक्कादायक आहे. ज्यांनी सात वेळा विधानसभेची निवडणूक जिंकली. मतदासंघात सहकारी संस्थांचे जाळे उभे केले. सहकाराच्या माध्यमातून त्यांनी तिथे अनेक लोकांना उभे करण्याचे काम केले. अशा स्थितीमध्ये या मतदारसंघात बाळासाहेब थोरात यांना एकाही मतदान केंद्रावर आघाडी मिळाली नाही. असे अनेक घटनाक्रम आपल्याला या निवडणूकीमध्ये पहावयास मिळतात. बऱ्याच ठिकाणी झालेले मतदान आणि ईव्हिएमवर दाखविण्यात आलेले मतदान यात तफवात पहावयास मिळाली. हे सर्व शंकास्पद असल्याचे लंके म्हणाले.

### नेवासे येथे निवडणूकच नव्हती !

नेवासे मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार शंकरराव गडाख हे होते. तिथे निवडणूकच नव्हती. दहा वर्षे जो माणूस कधी समाजामध्ये आला नाही तो माणूस तिथे विजयी झाला झाल्याचे लंके म्हणाले.

### खेडयातील माणूसही शंका घेऊ लागलाय !

लोकसभेच्या निवडणूकीमध्ये जनतेने आम्हाला कौल दिला. त्याचाच परिणाम महाराष्ट्र आणि हरियानामध्ये दिसून येत आहे. पूव राजकीय पातळीवर चर्चा होत असे की ईव्हीएम मॅनेज करता येते. ईव्हीएमवर शंका घेतली जात असे. परंतू आज सर्वसामान्य खेडयातील माणूसही ईव्हीएमवर शंका घेऊ लागला आहे.

नीलेश लंके खासदार, लोकसभा

### आता जनतेने उठाव करायला हवा

या विरोधात रणनिती काय असे विचारले असता खा. लंके म्हणाले, आता याविरोधात जनतेने उठाव केला पाहिजे. एखाद्या राजकीय पार्टीने उठाव करण्यापेक्षा जनतेने एकत्र आले पाहिजे. आपण रात्रंदिवस समाजामध्ये काम करायचे, कष्ट करायचे, जनतेची सेवा करायची आणि निवडणूकीमध्ये असा दगाफटका होत असेल तर अशा निवडणूकांना काही महत्व राहत नाही असे लंके यांनी सांगितले.

### ते त्यांचे व्यक्तिगत मत

काका पुतण्यांची हरविले म्हणून मा. मंत्री प्रा. राम शिंदे यांच्या डोळयात पाणी आले होते. पवार काका पुतणे एकच असल्याचा आरोप शिंदे यांनी केला होता, त्या प्रश्नावर बोलताना खा. लंके यांनी ते त्यांचे व्यक्तिगत मत असेल असे सांगत या प्रश्नाला बगल दिली.

### कार्यकर्ता प्रशासनावर विश्वास ठेवतो

मतपेटया बंद करताना १७ सी चा फॉर्म दिला जातो. त्याच्या अधारे आक्षेप का नोंदविला गेला नाही अशी विचारणा करण्यात आली असता बऱ्याच ठिकाणी हा फार्मच दिला गेला नसल्याचे खा. लंके म्हणाले. काही ठिकाणी फार्म आणले गेले नाहीत त्याला कार्यकर्त्यांचे दुर्लक्ष म्हणावे लागेल. कार्यकर्ता १७ सी फॉर्म घेताना प्रशासनावर विश्वास ठेवतो असेही लंके म्हणाले.

### निवडणूकच संशयास्पद

जयंत पाटील यांच्यासारखे राज्याचे नेतृत्व करणारे नेते जे एक लाखांच्या फरकाने विजयी होतात, ते ११ हजारांच्या मताधिक्क्याने विजयी झाले. बऱ्याच उमेदवारांची मतांची आकडेवारी पाहिली तर ती सारखीच आहे. त्यामुळे ही निवडणूकच शंकास्पद आहे असे लंके म्हणाले.

### आमच्या विचारांच्या गावातही अल्प आघाडी

माझ्या मतदारसंघात अशी काही गावे आहेत की जे महाविकास आघाडीच्या उमेदवाराला एक हजार, दिड हजार मताधिक्य देणारी गावे होती. तिथे महाविकास आघाडीच्या उमेदवाराला केवळ शंभर मतांची आघाडी मिळाली आहे. काही ठिकाणी संपूर्ण गावेच्या गावे आमच्या विचारांची होती. तिथेही आम्हाला मताधिक्य नाही असे लंके यांनी सांगितले.

# नगर-पुणे महामार्गावरील अपघातात ५ जखमी

## भरधाव कार मालवाहू ट्रकला धडकली



सुपा : प्रतिनिधी

**पुण्याहून नगरच्या दिशेने निघालेली कार रस्ता ओलांडणाऱ्या ट्रकला धडकल्याने झालेल्या भीषण अपघातात मढ सांगवी, ता. शिरूर येथील पाच जण गंभीर जखमी झाले. मंगळवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास औद्योगिक वसाहत परिसरातील  एच.पी.कंपनी संचलित पेट्रोलपंपासमोर हा अपघात झाला.**

यासंदर्भात पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार श्रावण राजाराम मलगुंडे वय २४, नीलेश सुदाम पाचंगे वय ३३, निखिल शिवाजी पाचंगे वय २१ , संतोष साहेबराव काळेकर वय २७ व प्रताप भाऊसाहेब पाचंगे वय ३७ सर्व रा. ढोक सांगवी, ता. शिरूर जिल्हा पुणे हे पुणे नगर महामार्गावरून मंगळवार दि.२६ रोजी रात्री ११ वाजता हयुंदाई व्हेर्ना या कारने क्र. एम एच १२ टीडी ८०९९ नगरच्या दिशेने चालले होते. एच.पी. पंप चौकात त्यांची कार आली असता त्याच वेळी नगरहून आलेली माल वाहू ट्रक औद्योगिक वसाहतीमध्ये जाण्यासाठी रस्ता ओलांडत होती. भरधाव वेगाने आलेल्या कार चालकाला ट्रक रस्ता ओलांडत असताना कार नियंत्रीत करता आली नाही. परिणामी कारची ट्रकला जोराची धडक होऊन भीषण अपघात झाला.

कारने ट्रकला दिलेली धडक इतकी भीषण होती की कारचा चक्काचूर होऊन कारमधील पाचही तरूण अडकून पडले. अपघाताची माहिती समजल्यानंतर सुपा पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत मदत कार्य सुरू केले. कारमध्ये मागे बसलेल्या तिघांना उर्वरीत पान ३ वर

# रस्त्यांसंदर्भात खा. लंके मंत्री गडकरींच्या भेटीला

## सकारात्मक निर्णयाची गडकरी यांची ग्वाही | नगर-मनमाड रस्त्याच्या कामाबाबतही चर्चा

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघातील विविध रस्त्यांची कामे तसेच बहुचचत नगर-मनमाड रस्त्याच्या कामासंदर्भात खा. नीलेश लंके यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेउन सविस्तर चर्चा केली. लंके यांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही मंत्री गडकरी यांनी दिली.**

लोकसभा निवडणूकीपूर्वी खा. नीलेश लंके यांनी नगर-मनमाड रस्त्याच्या दुर्दशेकडे लक्ष वेधले होते. नगर ते पाथड रस्त्याच्या रखडलेल्या कामासाठी त्यांनी नगर येथे उपोषण केल्यानंतर हे काम तात्काळ माग लागले होते तर नगर-मनमाड रस्त्याचे कामही माग लावण्याची ग्वाही मंत्री गडकरी यांनी दिली होती. त्यानुसार नगर-मनमाड रस्त्याच्या दुरूस्तीचे काम सध्या सुरू आहे.

नगर-मनमाड रस्त्याच्या कामाची नव्याने निविदा काढण्यात येणार असून ज्या ठिकाणी आवश्यकता आहे तिथे काँक्रीटीकरणाचा रस्ता करण्याची मागणी खा. लंके यांनी केली असून मंत्री गडकरी यांनी ती स्विकारलीही आहे. उर्वरीत पान ३ वर



# लाचेला सोकला, तिसऱ्यांदा जाळ्यात अडकला!

## महसूलचा अव्वल कारकून लाचलुचपतच्या जाळयात | शिर्डी, नगरनंतर आता पारनेरमध्येही फापाळेची लाचखोरी

पारनेर : प्रतिनिधी



उपविभागीय अधिकारी कार्यालय शिर्डी, जिल्हाधिकारी कार्यालयातील कुळकायदा शाखेत लाच स्विकारताना रंगेहात पकडून गुन्हे दाखल झाल्यानंतरही प्रशासनास हाताशी धरून पुन्हा सेवेत रूजू झालेला पारनेर तहसिल कार्यालयातील अव्वल कारकुन सुनील फापाळे हा तिसऱ्यांदा लाचेच्या जाळयात अडकला आहे. लाचेला सोकला आणि तिसऱ्यांदा जाळयात अडकलेल्या फापाळे याला जिल्हाधिकारी कार्यालयातून नेमका कोणाचा वरदहस्त आहे याची चर्चा पारनेर तहसिल कार्यालयात दिवसभर सुरू होती. उर्वरीत पान ३ वर

### तीन टक्के दराने लाचेची मागणी

पारनेर तालुक्यातील सुपा परिसरातील या गावात रोजगार हमी योजनेअंतर्गत ११ रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. त्याच्या प्रशासकीय मान्यतेसाठी तीन टक्के दराने लाचेची मागणी करण्यात आल्याची तक्रार अव्वल कारकून सुनील फापाळे याच्याविरोधात लाचलुचपत विभागाकडे करण्यात आली. दि. १५ ऑक्टोबर रोजी त्याची पडताळणी करण्यात आली होती.

### चार लाख रूपये स्विकारण्याची तयारी !

लाच पडताळणी कारवाईदरम्यान सुनील फापाळे याने पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडे गावातील ११ रस्ते काँक्रीटीकरण कामाच्या अंदाजपत्रकीय रकमेच्या दोन टक्के प्रमाणे स्वतःसाठी व तहसिलदारांसाठी ५ लाख ५० हजार रूपयांची मागणी केली. तडजोडी अंती ४ .लाख रूपयांची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने सुनील फापाळे याच्याविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

**लाचखोरांना कोण घालतेय पाठीशी?** विविध पदस्थापना करताना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून ठराविक कर्मचाऱ्यांना क्रीम टेबल दिले जात असून वर्षानुवर्षे एकाच टेबलवर आलटून पालटून बसणारे कर्मचारी आता रडारवर आले आहेत. पारनेरच्या तहसिल कार्यायातही असे काही कर्मचारी आहेत. सुनील फापाळे याला यापूर्वी दोनदा लाचखोरीत पकडलेले असताना पुन्हा त्यास क्रीम टेबल देणारे नेमके कोण ? त्याचीही कुजबूज तहसिल कार्यालयात सुरू होती.




# प्रगतीमंत्र

# टॅटू आर्टिस्ट

## करिअरचा हटके पर्याय

**हल्लीच्या काळात तरुणाई बरोबरच सर्वच वयोगटातील लोकांमध्ये मध्ये टॅटू काढण्याची प्रचंड क्रेझ निर्माण झाली आहे. अनेक जन आपल्या शरीरावर विविध ठिकाणी टॅटू काढतात. कोणी देवी-देवतांच्या नावांचे, श्लोकांचे किंवा चित्राचे टॅटूज काढतात. काहीजण गहन अर्थ दडलेला असल्याच्या विविध डिझाईन्स काढतात. एकूणच काय तर टॅटू हा आता एक फॅशन ट्रेंड बनला आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये टॅटू आर्टिस्टची मागणीही दिवसागणिक वाढत चालली आहे. त्यामुळे, तुम्हाला टॅटू काढण्यात आवड असेल तर ही बातमी खास तुमच्यासाठी आहे. आज तुम्हाला टॅटू आर्टिस्ट म्हणून करिअर कसे घडवावे आणि यासाठी काय पात्रता असणे आवश्यक आहे याबद्दल माहिती देणार आहोत...**

### पात्रता काय ?

या क्षेत्रात काम करण्यासाठी आजवर कोणतीही कमाल अथवा किमान मर्यादा घालण्यात आली नाही. मात्र, टॅटू काढण्यासाठी खास मशीन वापरल्या जातात. या मशिन्सने टॅटू कसे बनवायचे हे शिकण्यासाठी तुम्ही टॅटू स्टुडिओ किंवा इन्स्टिट्यूटमधून शॉर्ट टर्म कोर्स करू शकता. हे कोर्स एक ते सहा महिन्यांच्या कालावधीचे हे कोर्सेस असतात. शिवाय, टॅटू आर्टिस्ट म्हणून करिअर करण्यासाठी अनेक ऑनलाइन कोर्सेसही उपलब्ध आहेत.

### हे महत्त्वाचे...

या क्षेत्रात करिअर करण्यासाठी तुमच्यात खूप संयम आणि एकाग्रता असणे अत्यंत गरजेचे असते. शरीराशी थेट संबंध असलेली ही कला असल्याने तुम्हाला विज्ञान आणि इतर महत्वाच्या गोष्टींचे मूलभूत ज्ञान असणे गरजेचे असते. टॅटू बनवण्यासाठी त्वचेच्या वरच्या थरात शाईने एक डिझाइन कोरले जाते. अशा परिस्थितीत, आपण त्वचा रोग, संक्रमण आणि इतर अनेक गोष्टींविषयी तुम्हाला माहिती असणे गरजेचे असते. याशिवाय यशस्वी टॅटू आर्टिस्ट होण्यासाठी डिझायनिंगचे ज्ञानही खूप महत्त्वाचे आहे. या क्षेत्रात पुढे जाण्याची गुरुकिल्ली म्हणजे स्थिर हात असलेल्या शरीरावर काही कल्पनाशक्ती कोरणे देखील आहे. येथे थोडीशी चूक तुमच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवू शकते. त्यामुळे आवश्यक ते स्किल्स असणे महत्त्वाचे आहे.


### परवाना गरजेचा

टॅटू आर्टिस्ट होण्यासाठी परवाना असणे आवश्यक आहे. साधारणपणे ३६० तासांचे प्रशिक्षण आणि ५० यशस्वी टॅटू असलेल्या व्यक्तीला मान्यताप्राप्त कलाकार मानले जाते. त्यानंतर, संबंधित संस्थांमधील लेखी परीक्षेद्वारे त्याचे गुण तपासले जातात. या मूल्यमापनानंतर नामांकित संस्थेकडून परवाना देण्यात येतो.

### करिअरचा उत्तम पर्याय

- या क्षेत्रातील कमाई व्यक्तीच्या अनुभव आणि कामाच्या आधारे ठरवली जाते.
- मात्र, कोर्स पूर्ण केल्यानंतर टॅटू आर्टिस्टला सुरुवातीच्या टप्प्यात महिन्याला अंदाजे २० ते २५ हजार रुपये सहज मिळू शकतात.
- पण काही वर्षांच्या अनुभवानंतर जर तुम्ही नाव कमावले तर ही कमाई लाखोंच्या घरात पोहचू शकते.
- शिवाय, तुम्ही टॅटू पार्लर सुरू करून अनेकांना रोजगार उपलब्ध करून देऊ शकता.
- यासोबतच, तुम्हाला आवड असल्यास तुम्ही तुमची नोकरी सांभाळून फावल्या वेळेत टॅटू आर्टिस्ट म्हणून काम करू शकता.

# करूया ऑफिसच्या कामांचे उत्तम नियोजन



**हल्ली प्रत्येकाला आपल्या कामाची चिंता सतावत असते. आजचा दिवस संपला तरी उद्याचे काय हा प्रश्न असतोच. नोकरीवर आपला चरितार्थ असल्याने प्रत्येकजण तिथे चिकाटीने काम करत असतो. पण बरेचदा काम अधिक असेल तर त्याचा ताण जाणवू लागतो. कधीकधी कार्यालयीन वेळ उलटून गेली तरी काम आटोपत नाही, अधिकाचा वेळ काढून काम पूर्ण करावे लागते. पण या गोष्टी टाळताही येऊ शकतात. काम सोपे करण्यासाठी आवश्यक असते ते कामाचे नियोजन. खूप काम एकत्र आले की त्याचे नियोजन करणे राहून जाते. पण नियोजनपूर्वक आणि शिस्तबद्ध पद्धतीने कामा केले तर ते सहज आणि वेळेत पूर्ण होऊ शकते. त्यासाठी काही खास गोष्टी आपल्याला आंगीकाराव्या लागतील. त्यासाठीच ऑफिसच्या कामाचे नियोजन कसे करावे हे जाणून घेऊया...**

- कामाची आखणी करा : ऑफिसमध्ये तुमचे कामाचे स्वरूप ठरलेले असेल त्यानुसार तुम्हाला काही टार्गेट देखील असतील तर त्याची आधी आखणी करा. आपल्यापुढे किती काम आहे आणि ते कसे पूर्ण करायचे याचा एक कृती आराखडा तयार करा. विशिष्ट पद्धतीने ठरवून काम केले तर टार्गेट पूर्ण करता येते.
- कामाचा क्रम ठरवा : खूप कामे अंगावर असतील तर आधी त्याचा क्रम ठरवता याला हवा. आपल्या वरिष्ठांशी चर्चा करून कोणत्या कामाला किती महत्व द्यायचे आणि कोणते काम आधी पूर्ण करायचे हे निश्चित करा. कामाचा क्रम ठरवला तर कामे हातवेगळी करणे सोपे होते आणि कामाला अधिक गती येते.
- वेळेचे नियोजन : आपल्या हातात किती वेळ आहे आणि काम किती आहे कळल्यानंतर वेळा ठरवून घ्या. एखादे विशिष्ट काम एखाद्या वेळेतच पूर्ण करण्याचे टार्गेट ठेवा. तसेच कुठे वेळ वाचवता येईल याचा विचार करून त्यानुसार कामे करा. वेळेचे गणित साधले तर कोणतेही काम पूर्ण करता येते.
- फोनवर बोलणे टाळा : अनेकदा कामात असतानाही कामाव्यतिरिक्त अनेक फोन कॉल आणि मेसेज आपल्याला येत असतात. अशावेळी त्यांना महत्व न देता कामासाठी वेळ द्यायला हवा. आपण बाहेरच्या कॉल आणि मेसेजला प्राधान्य दिले तर त्यात आपला बराच वेळ निघून जातो आणि कामे अर्धवट राहतात.
- कामाचा अतिरिक्त भार आल्यास : कामाचा अचानक अतिरिक्त भार आल्यास त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करा. ते काम किती आहे, किती वेळात पूर्ण करता येईल याचा अंदाज घ्या. काम तुमच्याकडून शक्य होणार नसेल तर सहकाऱ्यांची मदत घ्या. त्या संदर्भात वरिष्ठांशी चर्चा करून त्याचे नियोजन करा. त्या कामाची तातडी लक्षात घेऊन त्याचा प्राधान्यक्रम ठरवायला हवा.



- नोंदवही करा : आपल्या कामाची नोंदवही आपल्याकडे हवी. आज कोणते काम करायचे आहे, ते किती वेळात करायचे आहे. त्यासाठीच्या सूचना काय आहेत, ऐनवेळी काही बदल झाले आहे का आणि अन्य अनेक लहानमोठ्या नोंदी या वहीमध्ये किंवा डायरीमध्ये करून ठेवा. अशा नोंदी ठेवल्यास आपल्याला कामाचे, वेळेचे स्मरण राहते. घाई गडबडीत काही विसरलोच तर त्याची आठवण करून देण्यासाठी अशी नोंदवही उपयोगी ठरते.



# अर्थशास्त्रातील करिअर वाटा!

**अर्थशास्त्र हा विषय काहीसा क्लिष्ट आणि अवघड असल्याने मोजकेच विद्यार्थी अर्थशास्त्र घेऊन पदवी आणि पुढचे शिक्षण करतात. पण या विषयातही करिअरच्या प्रचंड संधी आहेत, ज्या तुम्हाला भरघोस पगाराच्या नोकऱ्या मिळवून देऊ शकतात. तेव्हा पाहूया काय आहेत या संधी...**

कला आणि वाणिज्य शाखेत अर्थशास्त्र विषय निवडण्याचा पर्याय असतो. पदवीच्या दोन्ही वर्षांना हा विषय विद्यार्थी अभ्यासक्रमात घेतात, पण तिसऱ्या म्हणजे पदवीच्या शेवटच्या वर्षाला अनेकजण याबाबत फेरविचार करतात. कारण अनेकांना अर्थशास्त्र अवघड किंवा शिकायला जड वाटते. पण तुम्ही जर थोडी मेहनत घेऊन हा विषय शिकलात, अर्थशास्त्रात पदवी आणि पुढचे शिक्षण घेतले तर करियरच्या नव्या वाटा आणि अनेक संधी तुमच्यापुढे खुल्या होतील. 'अर्थशास्त्र म्हणजे अर्थ + शास्त्र म्हणजेच पैशांशी निगडित शास्त्र होय.' असा अनेकांचा गैरसमज आहे. आर्थिक व्यवहारांशी निगडित हा विषय असला तरी शब्दानुसार तो पैशांशी निगडित म्हणावे इतका सोपाही नाही. अर्थशास्त्र म्हणजे विविध क्षेत्रातील वित्त आणि माहिती विषयाचा अत्यंत सूक्ष्म आणि सखोल अभ्यास घडवणारे शास्त्र होय. त्यामुळे ते शास्त्र आत्मसाद करणेही काहीसे कठीण असते पण अशक्य नक्कीच नाही. जर तुम्ही त्यात तज्ञ झालात तर मग करियरची चिंता करण्याचे काहीच करत नाही. अर्थशास्त्र या विषयाची व्याप्ती मोठी आहे. ज्याचे विभाजन सूक्ष्म अर्थशास्त्र, स्थूल अर्थशास्त्र, विकासाचे अर्थशास्त्र, कल्याणकारी अर्थशास्त्र, गणितीय अर्थशास्त्र, कृषी अर्थशास्त्र अशा उप आणि महत्वपूर्ण घटकात केले आहे. तुम्हाला ज्या घटक विषयात रस असेल त्यात तुम्ही पदवीच्या पुढचे, अगदी पीएच.डी. पर्यंत शिक्षण घेऊ शकता. आज अनेक महाविद्यालयांमध्ये हा विषय निवडण्यासाठी विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शनही केले जाते.

### भारतातील काही खास संस्था...

- टाटा समाज विज्ञान संस्था मुंबई
- दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली
- दिल्ली विद्यापीठ, नवी दिल्ली
- जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, नवी दिल्ली
- मद्रास स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, चेन्नई
- गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे
- मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, मुंबई विद्यापीठ, मुंबई
- इंडियन इन्स्टिट्यूट, कोलकता
- इंदिरा गांधी डेव्हलपमेंट रिसर्च इन्स्टिट्यूट, गोरेगाव, मुंबई
- कृषी संशोधन व विकास संस्था, बंगळुरू
- बनारस हिंदू विद्यापीठ, वाराणसी
- याखेरीज अनेक विद्यापीठांमध्ये आणि खासगी संस्थांमध्ये अर्थशास्त्र विषयातील संशोधन आणि शिक्षणासाठी विशेष विभाग आहेत.



### अर्थशास्त्र विषयातील रोजगाराच्या संधी...

- अर्थशास्त्र विषयाला स्पर्धा परीक्षांमध्ये खूप महत्वाचे स्थान आहे. त्यामुळे या विषयातून पदवी आणि पुढचे शिक्षण झाल्यास स्पर्धा परीक्षा तुम्ही देऊ शकता.
- ज्या विद्यार्थ्यांचे अर्थशास्त्र विषयात पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण झाले असेल त्यांना 'आयएस' म्हणजेच इंडियन इकॉनॉमिक सर्व्हिसेस मध्ये नोकरीची संधी मिळू शकते.
- अर्थशास्त्र विषयात पदवी आणि पुढे आवश्यक ते शिक्षण घेऊन शाळेत शिक्षक किंवा महाविद्यालयांमध्ये प्राध्यापक होता येते.
- 'अर्थशास्त्रा'मध्ये 'सांख्यिकी' हा विषय महत्त्वाचा आहे. या विषयात तुमची तज्ञता मिळवती तर राज्याच्या जिल्हा आणि राज्य पातळीवर शासनाची अनेक सांख्यिकी कार्यालये आहेत. ज्यामध्ये 'डेटा सायन्स'च्या मदतीने माहितीचे विश्लेषण केले जाते. त्यामुळे या विभागांमध्येही मोठी संधी असते.
- अर्थशास्त्राचे पदवीधर बँकिंगच्या मोठ्या परीक्षा देऊन बँकेत अधिकारी पदावर रुजू होऊ शकतात. 'आरबीआय'मध्ये यंगस्कॉलर परीक्षा देऊन उच्च पदावर सेवा करता येते. शिवाय 'आरबीआय'सह अनेक बँकेत अधिकारी पदाच्या संधी उपलब्ध असतात.
- सरकारच्या वित्त विभागात या विद्यार्थ्यांना नोकरी मिळू शकते, कारण करआकारणी, करवसुली त्याचे व्यवस्थापन यासाठी अर्थशास्त्र तज्ञांची गरज असते.
- पदव्युत्तर शिक्षणानंतर या विद्यार्थ्यांना विविध परीक्षांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, युनो अशा आंतरराष्ट्रीय पातळीवरही संधी मिळू शकते.
- कृषी अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी मिळवली तर कृषी क्षेत्रातही संधी आहेत. कारण शेतीचे नियोजन, उत्पादन पद्धती, आधुनिक दृष्टिकोन, शेतीचीअर्थव्यवस्था याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी अर्थशास्त्र तज्ञांचीच गरज असते.
- अर्थशास्त्र या विषयाची व्याप्ती मोठी असल्याने त्यातला कोणताही एक सूक्ष्म घटक घेऊन तुम्ही संशोधन करू शकता. ज्यातून पुढे अनेक संधी आहेत. या शिवाय व्यवस्थापन म्हणजे मॅनेजमेंट क्षेत्रातही अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक संधी आहेत.



# आर्टिफिशियल इंटेलिजन्स

**हल्ली अनेक मशीन्सना तोंडी आदेश समजतात. चित्रे ओळखतात. गेम्स खेळतात, एडिटिंग करतात किंवा अगदी गेम्स खेळतात, मानवांच्या कार्यपद्धतीपेक्षा बरेच कामे करतात. पण, एआयला माहिती पुरवणारे आणि हे तंत्रज्ञान विकसित करणारे तंत्र शिकण्याची संधी तुम्हाला मिळाली तर... ? एआय ही जगभरात प्रसिद्ध असलेली टेक्नॉलॉजी आहे.आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) म्हणजे मानवी बुद्धिमत्तेसारखे शिकण्याची क्षमता मशीन्समध्ये आणि त्या मशीनमधल्या सॉफ्टवेअर प्रोग्रॅम्समध्ये तयार करण्यासाठी वापरले जाणारे तंत्र. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्तेचा अनेक क्षेत्रात एआय तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. सध्या चॅट जीपीटी म्हणा किंवा अन्य काही ॲप्लिकेशन्स आणि सॉफ्टवेअर्स, तसंच उपकरणांमध्ये होत असलेला एआय तंत्राचा वापर पाहता भविष्यात अनेक कामांची जागा मशिन्स घेणार यात दुमत नाही. एआयचे हे क्षेत्र दिवसागणिक अधिक प्रगत होत जाऊन अत्यंत वेगाने वाढत आहे. म्हणूनच, या क्षेत्रात करिअरच्या अनेक संधी उपलब्ध होत आहेत.**



**मिळू शकतो एवढा पगार :** आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रात शिक्षण घेतलेल्यांना मोठ्या पगाराची नोकरी मिळू शकते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्रातली पदवी घेतलेल्या विद्यार्थ्याला सुरुवातीलाच महिन्याला ५० ते ६० हजार ते लाखोंच्या घरात वेतन मिळू शकते. त्यानंतर अनुभव आणि कौशल्य यांच्या आधारे वेतन कमी-जास्त होऊ शकतं.


## या कोर्सेसनंतर कामाची उत्तम संधी

### एवढे असावे शिक्षण

एआय या क्षेत्रात करिअर करायचं असेल, तर सायन्स अर्थात विज्ञान शाखेतून बारावीपर्यंतचे शिक्षण विज्ञान शाखेतून पूर्ण झालेलं असणे आवश्यक आहे. कॉम्प्युटर सायन्स, आयटी, मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट प्रोग्राम, पीजी प्रोग्राम इन मशीन लर्निंग हे आर्टिफिशियल इंटेलिजन्समध्ये करिअर करण्यासाठी मुख्य कोर्स आहेत. आर्टिफिशियल इंटेलिजन्स कोर्स करण्यासाठी संगणक आणि गणित विषय अनिवार्य आहेत. कॉम्प्युटर सायन्सचे पदवीधर उमेदवारही या क्षेत्रात काम करु शकतात. आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी निगडित विविध क्षेत्रांत स्पेशलायझेशन करून त्यात एक्स्पर्ट होता येते.

### निगडित प्रमुख कोर्सेस

- मशीन लर्निंग आणि एआय या विषयांत पदव्युत्तर पदवी
- फाउंडेशन ऑफ आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग
- आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या विषयात पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम
- फुल स्टॅक मशीन लर्निंग अँड आर्टिफिशियल इंटेलिजन्स प्रोग्राम
- आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डीप लर्निंग या विषयात पोस्ट ग्रॅज्युएट सर्टिफिकेट प्रोग्राम



### कोर्स कुठे करता येतील ?

आर्टिफिशियल इंटेलिजन्स क्षेत्राशी निगडित कोर्सेस आयआयटी कॉलेजेसमध्ये करता येतात. खरगपूर, दिल्ली, मुंबई, कानपूर, मद्रास, गुवाहाटी, रूरकी या शहरांतल्या आयआयटी कॉलेजेसमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित कोर्सेस आहेत. त्याशिवाय बेंगळुरूतील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, नवी दिल्लीतली नेताजी सुभाष



इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बिट्स-पिलानी, बेंगळुरूतलं सेंटर फॉर आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड रोबॉटिक्स, म्हैसूरमधली नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग, अलाहाबादमधली इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, तसंच हैदराबाद विद्यापीठ या संस्थांमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी निगडित कोर्सेस उपलब्ध आहेत.

## शॉर्ट न्यूज

### महायुतीच्या नेत्यांचा जोमाने कामाचा निर्धार

■ **श्रीरामपूर :** विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्ष व महायुतीचे अधिकृत उमेदवार लहू कानडे यांना मत विभागणीमुळे पराभवाला सामोरे जावे लागले. मात्र पराभवाने खचून न जाता आगामी निवडणुकांमध्ये एकजुटीने व अधिक जोमाने काम करण्याचा निर्धार महायुतीच्या कार्यकर्त्यांनी केला. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस भवन येथील बॅरिस्टर रामराव आदिक सभागृहात महायुतीच्या वतीने विचारविनिमय तसेच आभार व्यक्त करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते.

### शिक्षकाला अज्ञात भामट्याने घातला गंडा

■ **राहुरी :** सेवानिवृत्त शिक्षकाची बाजाराची पिशवी फाडून त्यात ठेवलेली ४० हजार रुपये रोख रक्कम अज्ञात भामट्याने चोरून नेल्याची घटना राहुरी शहरातील आठवडे बाजारात २५ नोव्हेंबर रोजी घडली. सुधाकर विठोबा चौधरी हे सेवानिवृत्त शिक्षक आहेत. ते सध्या पिंपरी-चिंचवड येथे राहत असून, त्यांचे मूळ गाव राहुरी आहे. दि. २५ नोव्हेंबर रोजी ते कामानिमित्त राहुरीत आले. सकाळच्या दरम्यान त्यांनी तेथील स्टेट बँकेतून ४० हजार रुपयांची रक्कम काढली.

### शिष्यवृत्ती पूर्व सराव परीक्षा सुरळीत पार

■ **अकोले :** तालुक्यातील मिशन आरंभ अंतर्गत पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती पूर्व सराव परीक्षा सुरळीत पार पडली. ५ वी व ८ वी या वर्गासाठी रविवारी घेण्यात आलेल्या या परीक्षेसाठी पाचवीचे १३०७ व आठवीचे ११६ असे एकूण १४२३ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. दरम्यान, सराव परीक्षा केंद्रांवर प्रभारी गटविकास अधिकारी विकास चौरे यांनी अचानक भेटी देऊन पाहणी केली. मिशन आरंभ अंतर्गत राज्यात ९ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या परीक्षेसाठी जिल्हा परिषदेने मिशन आरंभ अंतर्गत ५ सराव परीक्षा घेण्याचे नियोजन केले आहे.

### माजी आमदार गडाखांची भावनिक साद

■ **नेवासा :** तिकडे मला पैसा-सत्ता सर्व देत होते, मात्र मी ते नम्रपणे नाकारले. मी सोयीचे राजकारण केले असते तर मला कधीच अपयश आले नसते. मी लढणारा आहे आणि मी लढणार आहे. यश अपयशाची पर्वा नाही. तुम्ही साथ द्या, यश मिळून दाखवतो अशी भावनिक साद माजी आमदार शंकरराव गडाख यांनी कार्यकर्त्यांना घातली. नेवासा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानतंर माजी आ. गडाख यांनी मुळा सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर आभार सभा घेऊन कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

### संवत्सरमध्ये परिसरात बिबट्याची दहशत

■ **कोपरगाव :** तालुक्यातील संवत्सर व दहेगाव परिसरात बिबट्याने दहशत निर्माण केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. संवत्सर, दहिगाव परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे. संवत्सर गावात सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक राजेंद्र लोखंडे यांच्या चिकूच्या बागेत तसेच दसरथवाडी रस्त्यावरील डॉ. जगताप यांच्या पेट्रोल पंपाच्या आजूबाजूला, त्याचप्रमाणे दहेगाव येथील राहुल वरकड यांच्या घराच्या पाठीमागे कपाशीमध्ये बिबट्या आढळून आला. रात्रीच्या वेळी शेतकरी पिकांना पाणी देण्यासाठी शेतात जातात.

# नागराज मंजुळे यांना न्यायालयाने बजावले समन्स

■ खाशाबा चित्रपटाची कथा वादाच्या भोवऱ्यात

■ लेखकानेच ठोकला कॉपीराइटचा दावा



**पुणे : प्रतिनिधी**

**मराठी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना न्यायालयाने समन्स बजावले आहे. नागराज मंजुळे यांनी घोषित केलेल्या खाशाबा जाधव यांच्या जीवनावरील चित्रपटातील कथा सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. कथेचे मूळ लेखक हे संजय दुधाणे आहेत. त्यांच्याकडे पुस्तकाचे कॉपीराइट आहेत. त्यामुळे त्यांनी नागराज मंजुळे यांच्यासह जिओ स्टुडिओ, आटपाट प्रोडक्शन, निर्माती ज्योति देशपांडे यांच्याविरोधात पुणे जिल्हा व सत्र न्यायालयात कॉपीराइट भंगचा दावा दाखल केला आहे.**

लेखक संजय दुधाणे यांच्याकडे खाशाबा जाधव यांच्या चरित्र पुस्तकाचे २००१ पासून हक्क आहेत. तसेच भारत सरकारच्या कॉपीराइट कार्यालयाचे प्रमाणपत्र देखील दुधाणे यांच्याकडे आहे. चित्रपटाची निर्मिती व प्रदर्शन करण्यास निरंतर मनाई व ठरावासाठी वकील रवींद्र शिंदे व सुवर्णा शिंदे यांनी न्यायालयात दावा दाखल केला आहे. त्यानुसार नागराज मंजुळे व ज्योती देशपांडे यांना जातीने हजर राहण्याचे समन्स बजावण्यात आले आहे.

दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्यासोबत लेखक संजय दुधाणे यांनी गेल्या चार वर्षांत दोन बैठका घेतल्या, तसेच वकिलांसोबत समझोता बैठका अशा चार बैठकीत निर्णय झाला नाही. त्यामुळे दुधाणे यांनी कॉपीराइट कायद्याचा भंग केल्याचा दावा दाखल केला. त्यानुसार आता मंजुळे यांना न्यायालयात हजर राहावे लागणार आहे.

**नेमके प्रकरण काय?**

खाशाबा चित्रपटाची मूळ कथा लेखक संजय दुधाणे यांची असताना नागराज मंजुळे यांनी रणजीत जाधव यांच्याशी बेकायदेशीर करार केल्याने हा वाद निर्माण झाला आहे.२०१९ मध्ये दिग्दर्शक नागराज मंजुळे यांनी चित्रपटाबाबत खाशाबा जाधव यांचे पुत्र रणजीत जाधव यांच्याशी करार केला होता. मूळात रणजीत जाधव यांनीच ३० ऑगस्ट २०१३ रोजी कराड येथे पत्रकार परिषद घेऊन खाशाबांच्या चित्रपटाची कथा ही संजय दुधाणे यांची असल्याचे घोषित केले होते.

मात्र, आता रणजीत जाधव यांनी संजय दुधाणे यांना डावलून संमती करार केल्याने हा वाद निर्माण झाला आहे. संजय दुधाणे यांनी २०२० मध्ये रणजीत जाधव यांची भेट घेतली होती. त्यावेळी पटकथा लेखक तेजपाल वाघ हे देखील उपस्थित होते. त्यावेळी झालेल्या चर्चेत लेखक म्हणून तुमचे नाव दिले जाईल व रणजीत जाधव यांच्याप्रमाणेच समान वाटा देऊन तुमचा मान राखला जाईल, असा शब्द नागराज मंजुळे यांनी संजय दुधाणे यांना दिला होता.

या बैठकीनंतर सकारात्मक प्रतिसाद न आल्याने २६ डिसेंबर २०२२ मध्ये संजय दुधाणे यांनी नागराज मंजुळे यांना नोटीस पाठवली. त्यानंतर कथालेखकाच्या वादामुळे हा चित्रपट मी करणार नाही असे मंजुळे यांनी रणजीत जाधवांना सांगितले होते. पुन्हा ५ जानेवारी २०२३ रोजी रणजीत जाधव यांनी त्यांच्या व नागराज मंजुळे यांच्या वकिलांसोबत दुधाणे यांची भेट घेऊन सहकार्य करण्याची विनंती केली.

दरम्यान, जिओ स्टुडिओने खाशाबा चित्रपटाची घोषणा केल्याने मंजुळे यांच्या पुण्यातील स्टुडिओमध्ये ८ जुलै २०२३ रोजी रणजीत जाधव यांच्या वकिलासह एकत्रित समझोता बैठक घेतली. यावेळी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते रणजीत चामले व पत्रकार विठ्ठल देवकाते उपस्थित होते. यावेळी संजय दुधाणे यांचे लेखक, संशोधक तसेच आभार प्रदर्शनात नाव देण्यात येईल व रणजीत जाधवांइतकेच मानधन देण्याचे ठरले होते. मात्र यावेळी नागराज मंजुळे आणि रणजित जाधव यांनी उदासीनता दाखवल्याने संजय दुधाणे यांनी नागराज मंजुळे व त्यांच्या आटपाट स्टुडिओला नोटीस पाठवली होती.

यानंतर एका बड्या मध्यस्थीदारामार्फत नागराज मंजुळे यांचे वकील ॲड. रामकृष्ण कुलकर्णी यांनी सप्टेंबर २०२४ मध्ये दोन वेळा प्रत्यक्ष भेटून समझोता करार लिहून आणला होता. तीन लाख रूपये देऊन पुस्तकाचे सर्व हक्क व चित्रपटाला ना हरकत देत आहेत, असे करारात लिहले होते. लेखक संजय दुधाणे यांच्या पुस्तकाचे सर्व हक्क रणजीत जाधव यांना द्यावे, अशी देखील अट या करारात होती. ही अट मान्य नसल्याने अखेर संजय दुधाणे यांनी पुणे सत्र न्यायालयात धाव घेतली.

**खाशाबांच्या जीवनावरील एकमेव पुस्तक**

संजय दुधाणे यांनी खाशाबा जाधव यांच्यावर लिहिलेले पहिलेच व एकमेव पुस्तक आहे. या पुस्तकासाठी खाशाबा यांच्या काळातील कुस्तीगीरांची भेट घेऊन परिपूर्ण माहिती एकत्रित केली होती. त्यानंतर महाराष्ट्राचे दिवंगत मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या हस्ते २००१ मध्ये पुस्तक प्रकाशित करण्यात आले. या पुस्तकाला २००८ मध्ये सर्वोत्कृष्ट क्रीडा पुस्तकाचा राज्यपुरस्कार मिळाला आहे. २००४ मध्ये इयत्ता ९ वी व २०१५ मध्ये इयत्ता सहावी वीच्या पाठ्यपुस्तकात या पुस्तकातील पाठ समाविष्ट करण्यात आला आहे. याच पुस्तकाच्या आधारे तेजपाल वाघ यांनी चित्रपटाची पटकथा लिहिली होती. त्याची पटकथा व संशोधन सर्व नागराज मंजुळे यांच्याकडे सुपूर्त केले होते. असे असताना तेजपाल वाघ व संजय दुधाणे या दोघांना अंधरात ठेवून मंजुळे चित्रपट निर्मिती करीत असल्याने हा वाद न्यायालयात पोहचला आहे.

# अन्नदानाच्या यज्ञामुळे लाखो लोक समाधानी

**रामायणाचार्य पारस महाराज मुथा यांचे प्रतिपादन**

**आगडगाव येथे काळभैरवनाथ जन्मोत्सव उत्साहात**

**आगडगाव : प्रतिनिधी**

**जेथे वर्षानुवर्षे अन्नदान होते, लोक तृप्त होतात, तेथे सकारात्मक ऊर्जा अधिक तयार होते. काळभैरवनाथ देवस्थानाजवळ सुरू असलेल्या अन्नदानाच्या यज्ञामुळे प्रत्येक वर्षी लाखो लोक समाधानी होत आहेत. या भूमित गोशाळेत गोसेवा होते. देवस्थानाजवळ आल्यानंतर मोठी सकारात्मक ऊर्जा असल्याचे जाणवते. अन्नदान हे पुण्याचे कर्म आहे. प्रत्येक मनुष्याच्या हातून ते व्हावे, असे मत रामायणाचार्य पारस महाराज मुथा यांनी व्यक्त केले.**



आगडगाव (ता.अहिल्यानगर) येथील काळ भैरवनाथ देवस्थानाजवळ सुरू असलेल्या सप्ताहाची सांगता मुथा महाराजांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. या वेळी कीर्तनातून त्यांनी प्रबोधन केले. कीर्तन सेवेच्या दरम्यान त्यांनी अन्नदानाचे महत्त्व विषद केले. आगडगावजवळ गेल्या अनेक वर्षांपासून बाजरीची भाकरी आमटी हा उपक्रम सुरू आहे. त्याची महती आता परदेशातही पोहोचली आहे. ही बाब कौतुकास्पद आहे. देवस्थानच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

दरम्यान, शनिवारी मध्यरात्री काळ भैरवनाथांचा जन्मसोहळा झाला. उद्योजक नरेंद्र फिरोदिया, गौरव भंडारी, गणेश आव्हाड आदींच्या हस्ते महापूजा झाली. महिलांनी पाळण्यात देवाचे फोटो ठेवून पाळणा गायला. या दिवशी दुपारी सुरू झालेला महाप्रसाद रात्री दोन वाजेपर्यंत सुरू होता. हजारो भाविकांनी दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला. परिसरातील आगडगाव, देवगाव च्या महिलांनी पोळ्या बनविण्याची सेवा दिली. जन्मोत्सवाच्या दिवशी दुपारी महाआरतीनंतर महाप्रसाद वाटप करण्यात आले. कीर्तनानंतर मान्यवरांचे सत्कार व काठ्या मिरवणूक कार्यक्रम झाले. रात्री बारा वाजता काशीहून तसेच कायगाव टोका येथून भाविकांनी आणलेल्या जलाने नाथांना अभिषेक घालण्यात आला. महिलांनी पाळणे म्हटले. या उपक्रमात पंचक्रोशीतील महिलांचा सहभाग होता.

# कल्याणमध्ये इमारतीला भीषण आग

**१३ व्या मजल्यावरील फ्लॅटची राखरांगोळी | सुदैवाने जीवितहानी टळली**

**कल्याण : प्रतिनिधी**



**कल्याण येथील आधारवाडी परिसरातील असलेल्या व्हर्टेक्स हाऊसिंग सोसायटीमध्ये एका फ्लॅटला भीषण आग लागल्याची घटना समोर आली आहे. या आगीत संपूर्ण फ्लॅट जळून खाक झाला आहे. या घटनेची माहिती मिळताच केडीएमसी अग्निशमन दलाची गाडी तातडीने घटनास्थळी दाखली झाली आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.**

आधारवाडी परिसरातील असलेल्या व्हर्टेक्स हाऊसिंग सोसायटीमधल्या एका इमारतीच्या १३ व्या मजल्यावर असलेल्या एका फ्लॅटला आग लागली. आग लागल्यानंतर वेळीच घरातील सदस्य घरातून बाहेर पडल्याने मोठी जीवितहानी टळली. मात्र, या आगीत संपूर्ण फ्लॅट अक्षरशः जळून खाक झाला आहे. आग लागल्याचे समजताच अग्निशाम दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप समजू शकले नाही. मात्र या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून सोसायटीमधील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या घटनेनंतर सोसायटीबाहेर वाहतुकीची देखील मोठ्या प्रमाणात कोंडी झाली तसेच बघ्यांची देखील मोठ्या प्रमाणात गर्दी जमली होती. तसेच फ्लॅट उंचावर असल्याने आगीला आटोक्यात आणण्यात देखील अडथळे येत आहेत. अग्निशमन दलाकडून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, मुंबई, ठाणे तसेच पुण्यात देखील उंच इमारती उभ्या केल्या जात आहेत. १०० मजली इमारत देखील आता मुंबईत उभारत आहे.

**वाचकांच्या लेखणीतून**

## इक ख़ुशी हमने दिल से चाही थी



मधुकर नेराळे : तमाशा कलावंतांचा आश्रयदाता हा सतीश डोंगरे यांचा श्रध्दांजलीपर लेख वाचला (पारनेर दर्शन, २७ नोव्हेंबर, बुधवार). लेख सुंदरच आहे. नेराळे यांच्या कारकिर्दीचा योग्य तो आढावा या लेखात घेतलेला आहे.

मुंबईच्या लालबागमधील एकटेदुकटे हनुमान थिएटर मराठी तमाशा कलावंतांसाठी उरले होते तेही १९९५ साली बंद पडले. ही तमाशासारख्या लोककला जपणाऱ्या कलावंतांचीच नव्हे; तर अखिल मराठी समाजाची मोठीच शोकांतिका म्हणावी लागेल.

हे जग सोडून जाण्यापूर्वी मधुकर नेराळे यांना एक टोचणी सतावीत असावी.

इक ख़ुशी हमने दिल से चाही थी।
वो भी ग़म की पनाह में गुज़री।।

एका खुशीची आम्ही मनापासून अपेक्षा केली होती. तीसुद्धा दु:खाच्या आसऱ्याखाली व्यतीत झाली.

मराठी मुलखातल्या तमाशासारख्या लोककलांना मुंबई नगरीत अवसर आणि उत्तेजन देण्यासाठी उभारलेल्या हनुमान थिएटरच्या पाडावाची ही टोचणी मधुकर नेराळे यांच्या मनात नक्कीच असावी, असे वाटते.

**नाना ढवळे, ८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# नगर शहरात 'घर घर संविधान' अभियान राबविले जाणार

**महापालिकेच्या वतीने विविध उपक्रमांचे नियोजन**

**नगर : प्रतिनिधी**

**भारताच्या संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महापालिकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून संविधान उद्देश पत्रिकेचे वाचन करण्यात आले. शासनाच्या आदेशानुसार पुढील वर्षभर अहिल्यानगर शहरात घर घर संविधान अभियान राबविण्यात येणार आहे. अहिल्यानगर महापालिकेत हर घर संविधान अभियानाच्या माध्यमातून संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सामूहिक वाचन केले. तसेच येत्या वर्षभरात महापालिके मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे नियोजन यावेळी करण्यात आल्याची माहिती महापालिकेतर्फे देण्यात दिली.**



या अभियानांतर्गत येत्या वर्षभरात अहिल्यानगर महापालिका मार्फत शाळा, महाविद्यालय, वसतिगृहे यांच्या दर्शनी भागात संविधानाची उद्देशिका लावणे, शालेय परिपाठात तसेच वसतिगृह प्रार्थनेत दररोज संविधान प्रास्ताविका, उद्देशिकचे वाचन विद्यार्थ्यांकडून करवून घेणे, शालेय वाचनालयात संविधानाच्या किमान पाच प्रती विद्यार्थ्यांना वाचनासाठी उपलब्ध करवून देणे, भारतीय संविधान बाबत सर्वसाधारण माहिती देणे, विद्यार्थ्यांना भारतीय संविधानातील प्रमुख प्रकरणे, हक्क, आणि कर्तव्ये यांवर मार्गदर्शन करणे, कार्यशाळांद्वारे विद्यार्थ्यांना संविधानाचे तत्त्वज्ञान आणि मूल्ये समजावून सांगणे, संविधान मूल्ये यावर पथनाट्य तयार करणे, शाळा, महाविद्यालयात संविधानाच्या विविध मुद्यांवर फलक, पोस्टर, आणि प्रदर्शन आयोजित करणे, संविधान दिन कार्यक्रम, संविधानावर आधारित निबंध लेखन, भाषण, वादविवाद, चित्रकला स्पर्धा आदी उपक्रमांचे आयोजन, प्रजासत्ताक दिनी संविधानातील मूल्यांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन व सादरीकरण करण्यात येणार असल्याचेही महापालिकेतर्फे कळविण्यात आले.

या वेळी प्रशांत खांडकेकर, उपायुक्त विजयकुमार मुंडे, प्रियांका शिंदे, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे, अशोक साबळे, कामगार नेते अनंत लोखंडे व कर्मचारी उपस्थित होते.

(पान १ वरून)

### नगर-पुणे महामार्गावरील अपघातात ५ जखमी

बाहेर काढण्यात यश आले. स्थानिक नागरीकांनीही मदत कार्यात भाग घेतला. तिघा जखमींना रूग्णवाहिका चालक सादिक भाई यांनी रूग्णालयात हालविले. तर कारमध्ये दोघे जोराची धडक बसल्याने कारमध्येच अडकून राहिले होते.जेसीबी यंत्राच्या मदतीने कारचा पत्रा तोडून त्यांना बाहेर काढून रूग्णालयात दाखल करण्यात आले. जखमींना रूग्णालयात पाठविण्यात आल्यानंतर अपघातग्रस्त वाहने रस्त्यावरून दुर करीत सुपा पोलीसांनी वाहतूक सुरळीत केली. पोलीस निरीक्षक अरूण आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली सुपा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

### लाचेला सोकला, तिसऱ्यांदा जाळ्यात अडकला!

यासंदर्भात लाचलुचपत विभागाकडून प्रसिध्दीस देण्यात आलेल्या पत्रकात नमुद करण्यात आले आहे की, लाचलुचपत विभागाकडे तक्रार करणाऱ्या तक्रारदाराच्या गावातील रस्ता काँक्रीटीकरणाच्या कामाचा ग्रामसभेत ठराव मंजुर करण्यात आला होता. या कामाचे ठराव कागदपत्रांसह तहसिलदार तथा गट कार्यक्रम अधिकारी महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना यांना सादर करण्यात आले होते. त्यानंतर तहसिलदार यांनी या कामाचे अंदाजपत्रक तयार करून त्यास तांत्रीक मान्यता देण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना तहसिलदार गायत्री सौंदाणे यांनी पत्र दिले.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी अंदाजपत्रक तयार करून तांत्रिक मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेसाठी हे अंदाजपत्रक तहसिलदारांना सादर केले होते. सापळा व तपासी अधिकारी अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पो हे कॉ संतोष शिंदे, महिला पो हे कॉ. राधा खेमनर, पो ना चंद्रकांत काळे, पोलिस अंमलदार रवींद्र निमसे, बाबासाहेब कराड, चालक पो हे कॉ हरून शेख यांनी ही यशस्वी कारवाई केली.

### खा. लंके मंत्री गडकरींच्या भेटीला

या कामाबाबत खा. लंके यांनी मंत्री गडकरी यांच्याकडे काही महत्वपुर्ण बाबीही मांडल्या. मतदारसंघातील काही रस्त्यांसाठीचे प्रस्तावही खा लंके यांनी या बैठकीत सादर केले. त्या कामांबाबत गडकरी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना देत पुढील कार्यवाही करण्यास सांगितल्याचे खा. लंके यांनी सांगितले. लोकसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू झाले असून कामकाजाच्या पाहिल्याच दिवशी खा. नीलेश लंके हे कामाला लागले आहेत. इतर विभागासंदर्भातील प्रस्ताव सादर करण्यासाठी खा. लंके हे लवकरच मंत्र्यांची भेट घेणार असल्याचे सांगण्यात आले.

# माळकुपच्या स्वामी समर्थ मंदिरात गुरुवारी शंभरावी पंगत!

## भाविक भक्तांचा दर्शनासाठी वाढता ओघ । दोन वर्षांच्या पंगतीची आगावू नोंदणी पूर्ण



### देणगीसाठी आवाहन

या देवस्थानच्या जीर्णोद्धार देणगी व अन्नदानाच्या पंक्तीसाठी ९९७ ५३६४६१५,८२०८२६११०६,९७३०२०५४३५ व ९३२२८७१४४९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन श्री.स्वामी समर्थ देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### शंभराव्या पंक्तीचे अन्नदाते

स्वामी समर्थ देवस्थान येथे दर गुरुवारी होणाऱ्या अन्नदानाच्या पंक्तीची दोन वर्षांची आगाऊ नोंदणी झाली असून शंभराव्या पंक्तीचे राजेंद्र अर्जुन तरटे,किरण बबन रोहोकले, बाळासाहेब यशवंत चेमटे व शिवाजी कोंडीबा बंडगर हे अन्नदाते आहेत.

माळकुप : सुदेश आबूज

**अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या माळकुप येथील श्री.स्वामी समर्थ देवस्थान येथे उद्या (गुरुवारी) अन्नदानाची शंभरावी पंगत होणार असून या निमित्ताने महाआरतीचा कार्यक्रमही होणार असल्याची माहिती देवस्थान समितीच्या वतीने देण्यात आली.**

माळकुप येथील उजाड माळरानावर सन २००३ रोजी अनेक स्वामी भक्तांनी एकत्र येत स्वामी समर्थ मंदिराच्या उभारणीस सुरुवात केली होती. यानंतर या मंदिरात अक्कलकोट प्रणित पंचधातूच्या स्वामी समर्थांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. प्रत्येक वर्षी दत्त जयंतीला या ठिकाणी उत्सव साजरा करण्यात येतो.मध्यंतरीच्या काळात जीर्णोद्धाराचे काम संथ गतीने सुरू होते मात्र, युवा स्वामी सेवकांनी जीर्णोद्धाराचे काम हाती घेतल्यानंतर या कामाला मोठ्या प्रमाणात गती मिळाली.

अनेक भाविक भक्तांच्या सहकार्याने जीर्णोद्धाराचे काम सुरू असून वेगवेगळ्या पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून या ठिकाणी सभा मंडपाचे, दळणवळणाच्या रस्त्याचे काम मार्गी लागले आहे. दानशूर भाविक भाविकांच्या देणगीतून मंदिराच्या कळसाचे तसेच प्रवेशद्वाराच्या कमानीचे कामही पूर्ण झाले आहे.नवसाला पावणारे देवस्थान म्हणून ख्याती लाभलेल्या या ठिकाणी नगर- पुणे जिल्ह्यातून अनेक भाविक मनोभावे स्वामींच्या दर्शनासाठी येत असतात.

### गुलाबजाम ते आमटी भाकरे

भाकर दर गुरुवारी स्वामी समर्थ देवस्थानात अनेक भाविक भक्तांकडून अन्नदान केले जाते. यावेळी प्रत्येक पंगतीला अन्नदानाचा वेगवेगळ्या मेनू ठेवण्यात येतो. अगदी गुलाबजाम ते आमटी भाकरीचा आस्वाद दर पंक्तीला भाविक भक्त घेत असतात. प्रत्येक अन्नदात्याच्या हस्ते महाआरती करण्यात येते. महाआरतीसाठीही मोठ्या प्रमाणात गर्दी होते.

स्वामी सेवकांच्या संकल्पनेतून या ठिकाणी दर गुरुवारी संध्याकाळी महाप्रसादाच्या पंक्तीची तसेच महाआरतीची सुरुवात करण्यात आली होती. सुरुवातीला अगदी दोन - तीनशे भाविकांच्या संख्येने अन्नदानास प्रारंभ झाला मात्र ही संख्या दर गुरुवारी वाढत जाऊन सध्या या ठिकाणी प्रत्येक गुरुवारी सुमारे दीड ते दोन हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असतात. या गुरुवारी( दि.२८ नोव्हेंबर) रोजी शंभरावी पंगत व महाआरती होणार आहे. सन २०२६ या सालापर्यंत पुढील दोन वर्षाच्या अन्नदानाच्या पंगतीची आगाऊ नोंदणी झालेली आहे.

नगर-कल्याण महामार्गावर भाळवणी गावाजवळ असलेल्या माळरानावर हे स्वामी समर्थ मंदिर आहे.येथील प्रसन्न अध्यात्मिक व रमणीय वातावरण भाविक भक्तांना वेगळीच प्रचिती देत असल्याने दिवसेंदिवस या देवस्थानकडे नगर व पुणे जिल्ह्यातील भाविकांचा ओघ वाढत आहे.

# चेडे बंधूंचे नियोजन, काशिनाथ दाते यांना आघाडी!

## पारनेर शहरात काशिनाथ दाते २ हजार ३०० मतांनी पुढे

पारनेर : प्रतिनिधी

**विधानसभा निवडणूकीतील महायुतीचे उमेदवार काशिनाथ दाते यांच्या प्रचाराचे योग्य नियोजन करून पारनेर शहरात दाते यांना २ हजार ३०० मतांची आघाडी मिळवून देण्यात जिल्हा परिषदेचे मा. सदस्य वसंत चेडे, नगरसेवक अशोक चेडे यांनी परीश्रम घेतले. महायुतीमधील घटक पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्याशी समन्वय ठेवत लोकसभा निवडणूकीप्रमाणेच या निवडणूकीतही आम्ही महायुतीच्या उमेदवारास आघाडी मिळवून दिल्याचे नगरसेवक अशोक चेडे यांनी सांगितले.**



यासंदर्भात माहिती देताना अशोक चेडे यांनी सांगितले की, या निवडणूकीमध्ये महायुतीमधील घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी सतर्क राहत प्रत्येक प्रभागात काशिनाथ दाते यांना आघाडी मिळवून देण्यासाठी नियोजन करण्यात आले होते. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार असून राज्यातही महायुतीचेच सरकार सत्तेत येणार याची खात्री मतदारांना असल्याने कोणत्याही अमिषाला बळी न पडता मतदारांनी महायुतीची निवड केल्याचे चेडे म्हणाले.

चेडे पुढे म्हणाले, लोकसभा निवडणूकीतही महायुतीचे उमेदवार मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्यासाठी आम्ही प्रचाराचे योग्य नियोजन केले होते. त्यामुळे लोकसभा निवडणूकीतही मा. खा. डॉ. सुजय विखे यांना पारनेर शहराने आघाडी दिली होती. तोच कल विधानसभा निवडणूकीतही कायम राहिला.

राज्यामध्ये महायुतीची सत्ता येणार असल्याने तसेच पारनेर मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी हे महायुतीचे असल्याने पारनेर शहरामध्ये विविध योजना राबविण्यासाठी आपण कटीबध्द आहोत. लवकरच यासंदर्भात आ. काशिनाथ दाते यांची भेट घेउन त्यांना विविध कामांसंदर्भात निवेदन देण्यात येणार असल्याचे चेडे म्हणाले.

# सोबलेवाडीचा पूल बनला धोकादायक

## कठडे बसविण्याची प्रवाशांची मागणी । गतिरोधक व दिशादर्शक फलकही नाहीत

सोबलेवाडी : प्रतिनिधी

**पारनेर-कान्हूर पठार मार्गावरील सोबलेवाडी जवळील रस्त्यालगत वळणावर असणाऱ्या पुलाला कठडेच नसल्याने हा भाग अपघातास निमंत्रण देणारा ठरत आहे.या पूलावर तातडीने कठडे बसविण्याची मागणी प्रवाशांनी केली आहे.**

यासंदर्भातील माहीती अशी की,तालुक्याच्या उत्तर भागातून बाजारपेठ असलेल्या पारनेर शहराकडे येणारा अति महत्त्वाचा मुख्य वाहिनी हा रस्ता आहे. सोबलेवाडी जवळ या रस्त्याला अनेक वळणे आहेत. त्या भागात रस्त्याला गतिरोधक व दिशादर्शक फलकही नाहीत.



राज्य महामार्गावरील कठड्याविना पूल अपघातास निमंत्रण' अशी स्थिती झाली आहे. विशेष म्हणजे कठडे नसलेल्या पुलांवरून वाहतूक वर्दळ मोठ्या प्रमाणावर होत आहे.

नाशिक- शिरूर असा हा पारनेर तालुक्यातून जाणारा अति महत्त्वाचा राज्य महामार्ग आहे.या भागात दोन्ही बाजुकडुन धोकादायक वळण असल्याने वाहन चालकाला अवघड प्रवासाला सामोरे जावे लागते यामध्ये समोरचा वाहन चालक वेगात असल्यास वाहन खाली घ्यावे लागते यामध्ये पुलाजवळ कठडेच नसल्याने वाहन पुलाखाली जाऊन अपघात होण्याची शक्यता आहे. पुलावर कठडे बसवावेत अन्यथा अपघात घडु शकतात अशी माहीती ग्रामस्थांनी यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभागास दिली आहे.मात्र कोणतीच कारवाई झाली नाही.

# संदीप कपाळे यांची राष्ट्रवादीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नियुक्तीपत्र

भाळवणी : प्रतिनिधी



**येथील उद्योजक संदीप दगडूभाऊ कपाळे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष,उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते नुकतेच त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून संदीप कपाळे हे पक्षाशी एकनिष्ठ आहेत.जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांचे ते कट्टर समर्थक आहेत. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांनी कपाळे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.

पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांची विचारधारा व राष्ट्रवादी काँग्रेसचा विचार समाजातील तळागाळापर्यंत रुजवून पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी यापुढील काळात प्रयत्न आपण करणार असल्याचे सांगत नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाळवणी गावातून महायुतीच्या उमेदवाराला मोठे मताधिक्य मिळवून दिल्याचे कपाळे यांनी सांगितले.

या निवडीबद्दल आमदार काशिनाथ दाते,जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील ,राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी अभिनंदन केले आहे.

# रूईछत्रपतीच्या विद्यार्थ्यांचा फायरिंग स्पर्धेत सहभाग

## ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची कामगिरी

सुपा : प्रतिनिधी

**निवृत्त ले. कर्नल साहेबराव शेळके यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या ग्रामीण भागातील उभरता सैनिक या अभियानांतर्गत एअर रायफल फायरिंग स्पर्धेत रूईछत्रपती येथील श्री ज्ञानेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून यश संपादन केले.**

ही स्पर्धा देवदैठण येथील सैनिक स्कुलच्या फायरिंग रेजे येथे स्कुलचे संचालक तथा प्राचार्य संजय कौठाळे यांच्या मार्गदर्शनाखाली २३ ते २७ नोव्हेंबर दरम्यान पार पडली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये खिलाडू वृत्ती वाढवून त्यांना सैन्य दलाकडे आकर्षित करण्याच्या हेतून अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असल्याचे संजय कौठाळे यांनी सांगितले.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण घेणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सहभागी शाळांचे शिक्षक तसेच सैनिक स्कुलचे शिक्षक यांनी संयुक्तरित्या माकग करून बेस्ट फायररची निवड केली. उत्तम स्पर्धकांना पारितोषिक देण्यात येऊन त्यांचा गौरव करण्यात आला. एकूण २० उत्कृष्ट विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्यांना विद्यापीठ, राज्य, व राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

चार दिवस चाललेल्या या स्पर्धेचे नियोजन निवृत्त ले. कर्नल साहेबराव शेळके, सैनिक स्कुलचे संचालक संजय कौठाळे यांच्यासह शिक्षकांनी नेटकेपणाने केले. या स्पर्धेतील विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी छत्रपती आजी-माजी सैनिक संस्था तसेच मार्गदर्शक राजू मेहेत्रे, इतर पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



### तीन विद्यार्थ्यांचे यश

या स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रकाश तडके यांच्या मार्गदर्शनाखाली ९ निवडक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी रोहन भिवसेन मेहेत्रे प्रथम, प्रथमेश कैलास प्रवीण देठे द्वितीय तर जयेश रोहिदास पठारे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. विद्यालयाचे नायक कैलास भोसले यांनी या स्पर्धेसाठी मेहनत घेतली.

# शोभा मोरे यांचे निधन

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**विरोली येथील रहिवाशी,माध्यमिक शिक्षिका शोभा संजय मोरे यांचे बुधवारी निधन झाले.त्या ४८ वर्षांच्या होत्या.**



श्रीमती मोरे या जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेत माध्यमिक शिक्षिका या पदावर सेवेत होत्या. टाकळी ढोकेश्वर येथील ढोकेश्वर विद्यालयातील सेवेनंतर सध्या त्या ढवळपुरी येथील दुर्गादेवी विद्यालयात कार्यरत होत्या.

गेल्या वर्षभरापूर्वी त्यांना कर्करोगाचे निदान झाले होते. उपचारानंतर या आजारातून त्या बऱ्या झाल्या होत्या मात्र काही दिवसांपूर्वी त्यांना मेंदूत काविळ झाल्याने त्यांचे निधन झाले.
गायकवाड मॅडम या नावाने त्या परिचित होत्या.पत्रकार संजय मोरे यांच्या त्या पत्नी होत.त्यांच्यामागे पती,कन्या समृद्धी असा परिवार आहे.विरोली या मुळ गावी त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# संविधानामुळे देशाची एकता व अखंडता कायम

## चंद्रकांत चेडे यांचे प्रतिपादन । किसान स्कुलमध्ये संविधान दिन साजरा



पारनेर : प्रतिनिधी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या देशाला दिलेल्या संविधानामुळे देशाची एकता व अखंडता कायम असल्याचे प्रतिपादन किसान बहुउद्देशिय संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत चेडे यांनी सांगितले.**

किसान कला, वाणिज्य, सायन्स व लॉ कॉलेजमध्ये संविधन दिन साजरा करण्यात आला, त्यावेळी चेडे हे बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ते पुढे म्हणाले, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी देशाला राज्यघटना दिली आणि दि. २६ जानेवारी १९५० पासून ती देशात लागू करण्यात आली. त्यापूव २९ ऑगस्ट १९४६ रोजी घटनेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. आंबेडकर यांची निवड करण्यात आली. त्यांनी विविध देशांच्या घटनेतून महत्वाच्या बाबींचा स्वीकार करून त्यांचा आपल्या राज्यघटनेत समावेश केला. संपूर्ण राज्यघटना तयार करण्यासाठी दोन वर्षे ११ महिने व १८ दिवसांचा कालखंड लागल्याचे चेडे म्हणाले.

संविधानामुळे देशात शांतता, सुव्यवस्था राहते. संविधानामुळेच देशाची एकता आणि अखंडता कायम आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षापासून संविधान दिन साजरा करण्यात येऊ लागल्याचेही चेडे यांनी सांगितले.

या कार्यक्रमात राज्यघटनेची प्रस्तावना, उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. विद्यार्थ्यांना प्रस्तावना, उद्देशिकेचे आकलन व्हावे या हेतूने हे वाचन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विशाल साळवे, विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य प्रा. वृषाली कावरे, प्रा. ज्योती वाळुंज, प्रा. प्रियंका जवक, प्रा. करिष्मा खोडदे, प्रा. बिना शेख, प्रा. जितेंद्र दळवी, प्रा. सुनिता नगरे, अश्विनी शेळके, कोमल चेडे आदी यावेळी उपस्थित होते.

# डॉक्टर प्रिमिअर लिगच्या दुसऱ्या पर्वाचे आयोजन

## शनिवारी शुभारंभ । चार संघांचा सहभाग

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर डॉक्टर प्रिमिअर लिगच्या पर्वाचे नगर येथे आयोजन करण्यात आले असून शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी या स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. स्पर्धेत चार संघांनी सहभाग नोंदविला असून शनिवारी सकाळी आठ वाजता स्पर्धेला सुरूवात होणार आहे. पारनेर तालुका मेडीकल प्रॅक्टीशनर असोसिएशन व न्युक्लिअर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**




नगर शहरातील जुना वाकोडी रस्ता, नक्षत्र लॉन जवळील साईदिप क्रिकेट क्लबच्या मैदानावर या स्पर्धा पार पडणार असून राज्याच्या आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष पद्मश्री पोपटराव पवार तसेच प्रसिध्द मधुमेह व संधिवात तज्ञ डॉ. गोपाल बहुरूपी यांच्या हस्ते सकाळी आठ वाजता स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार असल्याचे पारनेर तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर असोसिएशनचे तालुकाध्यक्ष डॉ. भाऊसाहेब खिलारी, सचिव डॉ. संदीप तांबे, उपाध्यक्ष डॉ. सोमेश्वर आढाव, खजिनदार डॉ. जितेंद्र खामकर यांनी सांगितले.

या स्पर्धेत ढोकेश्वर चॅलेंजर्स, भाळवणी वॉरीअर्स, पारनेर टायगर्स आणि निघोज सुपर किंग्ज हे चार संघ सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा पाहण्यासाठी क्रिकेट प्रेमींनी साईदिप क्रिकेट क्लबच्या मैदानावर हजेरी लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com